## -ग्रंथ परिचय-

### "Economics... and All That! A Feschtcrift in the Honour of Dr. S. R. Dastane"

**संपादक** – डॉ. मंजूषा मुसमाडे आणि डॉ. सुभाष पाटील
(प्रथमावृत्ती: २०२४ सुनिधी पब्लिशर्स पुणे ४११००२)

**धीरज कदम**
सहाय्यक प्राध्यापक
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग (स्वायत्त), रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

प्रा. डॉ. संतोष दास्ताने यांच्या अमृत महोत्सवानिमित्त प्रकाशित 'Economics and All That...!' हा डॉ. मंजूषा मुसमाडे आणि डॉ. सुभाष पाटील यांनी संपादित केलेला गौरवग्रंथ केवळ त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आदर व्यक्त करणारा दस्ताऐवज नाही, तर समकालीन आर्थिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक विषयांवर सखोल विचार मांडणारी एक महत्वपूर्ण साहित्यकृती आहे. ३५४ पृष्ठांचा हा ग्रंथ प्रामुख्याने अर्थशास्त्र आणि अनुषंगिक सामाजिक शास्त्रांवर आधारित असून, विविध विषयांवरील एकूण ४३ लेखांचा संग्रह यात समाविष्ट आहे.

ग्रंथाच्या सुरुवातीलाच लिहिलेल्या संपादकीयामध्ये संपादकांनी प्रस्तुत ग्रंथाचे अंतरंग अचूकपणे उलगडून दाखवले आहे. ग्रंथाची विभागणी दोन भागांमध्ये करण्यात आली असून पहिल्या विभागात प्रा. डॉ. संतोष दास्ताने यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्याचा आढावा घेणारे तीन लेख आहेत. मंजूषा मुसमाडे यांनी "गुरुर्देवो भव" या लेखातून गुरु-शिष्य नात्याचा प्रवास उलगडताना डॉ. दास्ताने यांच्या नेतृत्वगुणांचे आणि प्रोत्साहनात्मक भूमिकेचे हृद्य वर्णन केले आहे. प्रा. सोनाली मोरे-मधाळे यांनी त्यांच्या लेखन आणि वैचारिक योगदानाचे समर्पक विश्लेषण केले आहे. विजय परांजपे यांनी "Teachers Beyond Classroom" या लेखाद्वारे वैयक्तिक अनुभवांच्या माध्यमातून डॉ. दास्ताने यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या बहुआयामी कार्याचा परिचय दिला आहे.

हे लेख डॉ. दास्ताने यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंना उलगडून त्यांच्या कार्यकर्तृत्वाची संपन्नता आणि त्यांच्या प्रति असलेल्या आदराची साक्ष देतात. या लेखांतून प्रा. डॉ. दास्ताने यांचे आर्थिक, सामाजिक, आणि वैचारिक क्षेत्रातील योगदानाची प्रचीती येते.

प्रस्तुत ग्रंथाच्या दुसऱ्या भागात विविध आर्थिक आणि सामाजिक विषयांवरील एकूण ४० लेख आणि शोध निबंधांचा समावेश आहे. यात २३ लेख इंग्रजी भाषेत, तर १६ लेख मराठीत लिहिलेले आहेत. प्रस्तुत ग्रंथात माध्यमभाषेनुसार लेखांची विभागणी न करता दोन्ही भाषांतील लेखांचे संमिश्र स्वरूप ठेवण्यात आलेले आहे. यात लेखकांनी महत्त्वपूर्ण सामाजिक-आर्थिक विषयांवर विविधांगी पैलूंनी चिंतन तसेच संशोधनपर लेखन केले आहे. ज्यामुळे वाचकांना अर्थशास्त्राच्या व्यापक परिघाची प्रचीती येते.

या विविध लेखांचा क्रम यादृच्छिक असला तरी, त्यांच्या विषयवस्तूनुसार वर्गीकरण केल्यास डॉ. श्रीनिवास खांदेवाले आणि डॉ. मृणालिनी फडणवीस यांचे लेख सैद्धांतिक स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. डॉ. खांदेवाले यांनी रोजगार, किमती, आणि आर्थिक विषमता या प्रमुख प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी विद्यमान आर्थिक सिद्धांत कसे अपूर्ण आणि अपर्याप्त आहेत, याची तात्त्विक चिकित्सा मांडली आहे. तर डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी समाजाच्या आर्थिक व्यवस्थेच्या वस्तुस्थितीचे आणि आर्थिक चलांमधील गुंतागुंतीचे सर्वसमावेशक अध्ययन करण्यासाठी 'SOM (Set of Mix) Economics' या अभिनव दृष्टीकोनाची सखोल चर्चा केली आहे. हे लेख आर्थिक सैद्धांतिक विचारांवर आधारित असून, ते अर्थशास्त्राच्या व्यापक दृष्टिकोनाला समृद्ध करतात.

अपर्णा कुलकर्णी यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चे क्रांतिकारी स्वरूप आणि शिक्षण प्रणालीवर त्याचा होणारा व्यापक परिणाम यावर सखोल भाष्य केले आहे. समीत माहोरे यांनी कौशल्य विकास धोरणाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीची दिशा दाखवली आहे. तसेच सतीश श्रीवास्तव यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा रोजगार निर्मिती, आर्थिक धोरणे आणि जीवनशैलीवर होणाऱ्या परिणामांचा सविस्तर आढावा घेतला आहे. या लेखांमधून समकालीन धोरणांच्या परिणामकारकतेचा व सामाजिक बदलांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करता येतो.

आरोग्य विषयावर प्रा. रामदास माहोरे यांनी आरोग्याचे अर्थशास्त्र नव्या दृष्टिकोनातून उलगडले आहे, ज्यातून या क्षेत्रातील आर्थिक गुंतागुंतींचे विविध पैलू समोर येतात. प्रवीण जाधव यांनी कोविड-१९ महामारीच्या काळातील भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती व घडामोडींवर मार्मिक निरीक्षण नोंदवले आहे. सुभाष पाटील आणि तृप्ती कवळे यांनी आर्थिक विकासातील आरोग्याचे स्थान अधोरेखित करत जागतिक तसेच भारतीय आरोग्य स्थिती व प्रगतीचा वेध घेतला आहे. त्यांनी आरोग्य क्षेत्रासमोरील आव्हानांचा शोध घेऊन भावी दिशांचे भाकीतही केले आहे. हे लेख आरोग्य व सामाजिक कल्याण क्षेत्रातील आर्थिक समस्यांवर चिंतनशील विचार मांडत, उपयुक्त माहिती प्रदान करतात.

डॉ. बाबासाहेब माळी यांनी भारतीय स्त्री उद्योजकांच्या अडचणींचे विश्लेषण करून त्यांच्या समाधानासाठी संभाव्य उपाय सुचवले आहेत. लता धेंडे यांनी स्त्रियांचा रोजगारातील सहभाग वाढवण्यासाठी आवश्यक उपायांवर सविस्तर चर्चा केली आहे. अविनाश कुलकर्णी यांनी विवाह संस्कृतीच्या आर्थिक पैलूंचा अभ्यास करताना त्यातून होणाऱ्या आर्थिक उलाढालींचा वेध घेतला आहे. पूर्णिमा तापस यांनी मंदिर व्यवस्थेच्या अर्थकारणाचे विश्लेषण करत धार्मिक क्षेत्राच्या आर्थिक योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. हे लेख सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांना आर्थिक दृष्टिकोनातून समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरतात.

पर्यावरणाशी संबंधित विषयांवर अनिलकुमार वावरे आणि किशोर सुतार यांनी 'पर्यावरणाचे बदलते अर्थकारण' या लेखामधून पर्यावरणपूरक विकासावर भर दिला आहे. सागर ठक्कर यांनी शिक्षण पद्धतीत पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. शाश्वत विकासासाठी अर्थशास्त्राच्या भूमिकेचा सखोल विचार या लेखांमधून प्रकट होतो.

आशुतोष रारावीकर यांनी भारतीय बँकिंग प्रणालीतील बदलांचा सखोल अभ्यास सादर केला आहे. संजय तुपे यांनी जागतिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक प्रवाहांचे बारकाईने विश्लेषण केले आहे. शिल्पा भिडे यांनी आंतरराष्ट्रीय तेल बाजारातील घडामोडींचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा उलगडा केला आहे. मंगेश गोंदवले यांनी औद्योगिक क्षेत्रावर उदारीकरणाचे परिणाम तपशीलवार विशद केले आहेत. तसेच, अतुल देशपांडे यांनी आंतरविद्याशाखीयता आणि साम्राज्यवादाचे अर्थशास्त्र यासारख्या अनोख्या विषयांवर चिकित्सक आणि अभ्यासपूर्ण दृष्टिकोनातून मांडणी केली आहे. हे सर्व लेख जागतिक आणि भारतीय आर्थिक धोरणांची सखोल चिकित्सा करतात.

विभूती पटेल यांनी आपल्या लेखातून मानवी विकासातील लिंगाधारित पैलूंसारख्या यापूर्वी दुर्लक्षित परंतु अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सखोल मांडणी केली आहे. राजेंद्र भांडवलकर यांनी भारतातील दारिद्र्य आणि विषमता यावर विस्तृत आणि विचारप्रवर्तक चर्चा केली आहे. दिलीप अर्जुने यांनी कृषी मजुरीचे दर आणि त्यातील बदलांचे संशोधनाधारित विश्लेषण सादर केले आहे. मनू गौतम यांनी आपल्या लेखामध्ये मध्यप्रदेशातील माळवा प्रांतातील शेतकऱ्यांच्या समस्यांचा आढावा घेत, त्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्यांसोबत साधर्म्य दाखवून दिले आहे. मकरंद चिकोडीकर यांनी वित्तीय समावेशनाच्या विषयावर सखोल अभ्यास करून लेखन केले आहे. हे सर्व लेख भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रमुख आर्थिक समस्यांवर प्रभावीपणे प्रकाश टाकतात.

माधव शिंदे यांनी महाराष्ट्रातील नव-तंत्रज्ञानावर आधारित 'ब्ला ब्ला' या नव-माध्यमाच्या कार्यप्रणालीची तौलनिक माहिती सादर केली आहे, जी वाहतूक सेवांमध्ये घडणाऱ्या बदलांची झलक देते. इशिता दत्त यांनी पुरवठा साखळी व्यवस्थापन या विषयाचा वाहतूक क्षेत्राशी असलेला संबंध उलगडून, या विषयावरील अलीकडील चर्चांचा अर्थशास्त्रासह विविध शाखांतून परामर्श घेतला आहे. प्रकाश चौधरी यांनी कायदा व अर्थशास्त्र या अभ्यासक्षेत्रात येणाऱ्या न्यायालयीन विलंबित खटल्यांवरील उपाययोजनांचे आर्थिक दृष्टिकोनातून चिकित्सक विश्लेषण केले आहे. या लेखनातून अर्थशास्त्राचा व्यापक आणि सर्वसमावेशक परीघ अधिक स्पष्टपणे समोर येतो.

'Economics and All That...!' हा ग्रंथ एक व्यापक दृष्टिकोन देणारा दस्तऐवज आहे. विविध विषयांवर आधारित लेखांमुळे हा ग्रंथ आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून विचारमंथन करण्यासाठी उपयुक्त ठरतो. महाराष्ट्रामध्ये अर्थशास्त्र विषयाला सर्वार्थाने वाहून घेतलेली जी बोटावर मोजण्याइतकी व्यासंगी व अभ्यासू व्यक्तिमत्वे आहेत, त्यात डॉ. संतोष दास्ताने यांचे नाव अतिशय आदराने घेतले जाते. यांच्या कार्याला समर्पित हा ग्रंथ संशोधक, विद्यार्थी, आणि धोरणकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. सदर ग्रंथात सर्वच लेखकांनी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय आदी बहुशाखीय विषयांना न्याय देणारे, स्वतंत्रपणे आपले विचार विविध अंगांनी नमूद केले असून, प्रत्येक लेख हा वेगळ्या धाटणीचा व महत्त्वपूर्ण आहे. आर्थिक विषयांचे अभ्यासक, विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक, शासकीय अधिकारी, धोरणकर्ते, नियोजनकार आणि शासकीय, खासगी आणि स्वयंसेवी संस्था, ग्रंथालये आदींना हा ग्रंथ नक्कीच उपयुक्त ठरेल.

***